रे. मु. नं. २३६/२०१९
सीएनआरनं.महापु.१८-००२०४९-२०१९

## निशाणी क्र. ५ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीं यांनी प्रतिवादी क्रं. १ ते ३ व प्रतिवादी क्रं. १८ व १९ यांच्याविरुध्द तुर्तातुर्त मनाईसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३९ रुल १ व २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जामध्ये वादींनी असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही वादी नं.१ यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ आणि त्यांचा मयत भाउ वसंत यांचे वडिलोपार्जीत जमिनीचे वाटप सन १९८० साली मे. तहसिलदार सो दौंड यांचेकडील आदेश क्रं. तदभ/१/४००२/८०, दि. ०२/१२/१९८० ने झाले व फे. न. ८०२ अंमलात आला. सदरील वाटपात पॅरा नं. १ मधील दावा मिळकत ही केवळ वादी नंबर १ यांना वाटुन मिळाली व गट नंबर १६२/अ ही प्रतिवादी यांना १ व २ यांना वाटून मिळाली. गट नंबर ४८४ ही मिळकत वादी व प्रतिवादींची बहिण मयत छबुबाई हीला वाटुन मिळाली ती त्यावेळी तीचा मुलगा बबन नामदेव चोरमले यांचे नावावर लावली आहे. गट नंबर ६४५ ही मिळकत प्रतिवादी १ व २ व दुसरा मयत भाउ कै. वसंतराव म्हणजेच

प्रतिवादी क्रं. ३ चे वडिल यांना वाटून मिळाली व त्याप्रमाणे गावचे हक्कपत्रकी सदर वाटपाची नोंद मे. तलसिलदार साो यांच्या आदेशाप्रमाणे फे. न. ८०२ ने दिनांक २३/०२/१९८० रोजी मंजूर झालेले आहे. दावा मिळकत ही केवळ वादी नं. १ यांना वाट्रुन मिळाली आहे. सन १९८० सालपासून सदरची मिळकत ही केवळ वांदीचे एकटयाचेच प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस मालकी हक्काने आहे. सदर मिळकतीशी वादी शिवाय अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे संबंध नाही. दावा मिळकत वादी यांनी प्रतिवादी क्रं. १ ते ३ अथवा प्रतिवादी क्रं. १८ व १९ अगर कोणत्याही प्रतिवादीला तबदील केलेली नाही अथवा कोणत्याही महसूली अधिका–यापुढे हजर राहून त्यांचे नांवे दावा मिळकतीचा कोणताही भाग करुन दिलेला नाही. दावा मिळकतीमधील ३२ आर क्षेत्र वादी क्रं. १ यांनी त्यांची पत्नी म्हणजेच वादी क्रं. २ हिच्या नावावर कौटूंबिक व्यवस्था म्हणून केलेली आहे. परंतु दावा मिळकतीचा कब्जा वादी क्रं. १ यांचाच आहे. असे परिस्थती असताना प्रतिवादी क्रं. १ ते ३, १८ व १९ हे वादींचे दावा मिळकतीमधील शांतातामय कब्जेवहिवाटीस हिल्ला हरकत करु लागले. त्याविषयी वादींनी पोलिस स्टेशनकडे तक्रार केली असता पोलिसांनी त्याची कोणतीही दखल घेतलेली नाही. प्रतिवादी यांनी वादीच्या अपरोक्ष दावा मिळकतीच्या उता–यात नाव लावून घेतल्याचे वादीच्या निदर्शनास आले. प्रतिवादी हे दावा मिळकतीची विक्री करण्याची भाषा वापरत आहेत. तसेच दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जेवहिवाटीस हिल्ला हरकत करु पाहत आहेत. असे जर झाले तर वादी यांचे कधीही न भरुन येणार असे अपरिमित नुकसान होणार आहे. प्रथमदर्शनी केस न्यायाचा समतोल वादीच्या

वतीने आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**३.** प्रतिवादी क्रं. १ ते ३ व प्रतिवादी क्रं. १८ व १९ यांनी नि. ३७ कडे कैफियत देवून वादींचा दावा, ताकिद अर्ज व त्यातील मागण्या नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी हे स्वच्छ हाताने कोर्टासमोर आलेले नाही. वाद मिळकत ही मुळची श्री कृष्णा नारायण मदने यांची म्हणजेच वादी व प्रतिवादी यांच्या मुळ पुरुषाची वडिलोपार्जीत मिळकत होती. सदर कृष्णा नारायण मदने यांनी कुटूंबनियोजनाकरिता तहसिलदार यांचेकडे अर्ज देवून दावा मिळकत व इतर मिळकती यांची आणेवारीने वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद केली होती. परंतु मौजे गिरीम येथील अन्य वडिलोपार्जीत मिळकती म्हणजेच गट नंबर ४६१, ४६२, ४७१, ४९२ या कृष्णा नारयण मदने यांच्या नावे होत्या, त्यामुळे दावा मिळकत ही वादी क्रं. १ यास एकटयाला दिली असे म्हणता येणार नाही. कृष्णा नारायण मदने हे दिनांक १४/०७/१९९१ रोजी मयत झाले असून मौजे गिरीम येथील गट नंबर १६२, ४८४, ६४५, ६५३, ४६१, ४६२, ४७१ व ४९१ इत्यादीचे शेतजमीनी या वादी नं. १, प्रतिवादी क्र. १, २ व वसंत मदने यांच्या एकत्र कुटूंबातील समाईक वडिलार्जीत वहिवाटीच्या होत्या. मुळ पुरुष कृष्णा मदने यांच्या मृत्यूनंतर त्याचे वारस म्हणून मुले वसंत, साहेबराव, लक्ष्मण व नारायण तसेच मुली लिलाबाई, छबूबाई, जनाबाई यांची गट नंबर ४६१, ४६२, ४७१, ४९१ या मिळकतीच्या उता–यास फे. नं. १७९८ ने नोंद झाली.

वसंत कृष्णा मदने यांनी दिलेल्या अर्जावरुन वाटप/एस.आर./४२८/२००१ दिनांक २१/०१/२००२ च्या आदेशाने गट नंबर ४६१, ४६२/१/अ, ४७१, ४५७, ६५३, ४४५ इत्यादी मिळकतींचे सरसनिरस मनाने वाटप होवून फे. नं. २८७५ नोंदविला आहे. सदरचे वाटप वादी व सर्व प्रतिवादी यांच्या संमतीने झालेली आहे. सदर आदेशाप्रमाणे दावा मिळकत क्षेत्र १ हे २९ आर पैकी वादी क्रं. १ यांना ३२ आर, प्रतिवादी क्रं.१ यांना ३३ आर, प्रतिवादी क्रं. २ यांना ३२ आर व प्रतिवादी क्रं. ३ चे वडिल वसंत यांना ३२ आर अशा प्रमाणे दावा मिळकतीचे वाटप झालेले आहे. तेव्हा पासून दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचे शांततामय कब्जेहिवाट आहे. तसेच गट नंबर ६५७ हा पुर्वी प्रतिवादी क्रं. १ व २ व प्रतिवादी क्रं. ३ चे वडिल वसंत यांच्या मालकीचा होता. परंतु सन २००२ च्या वाटपाप्रमाणे वादी क्रं. १ यांना सदर मिळकत वाटून दिलेली आहे. वादी क्रं. १ यांनी त्यांना वाटपाने आलेल्या शेतजमीन गट नंबर ४६१/१, ४६२/२/अ/१, ४७१, ४५७, ६५३, ६८४, ६४५, ६५७ या मिळकतीचे वाटप करण्यासाठी त्यांनी मा. तहसिलदार साो दौंड यांच्याकडे वाटप/एस.आर./७७/२००२ हे प्रकरण दाखल केले होते. त्याप्रमाणे त्यांची पत्नी वादी क्रं. २ सुमन व मुलगा दामोदर यांची नांवे ७/१२ पत्रकी फे. नं. २८९३ ने नोंद झाली. त्यामुळे तहसिलदारांकडे झालेल्या पुर्वीच्या वाटपाची पुर्वकल्पना वादी यांना होती. प्रतिवादी क्रं. १८ यांनी त्यांचे एकत्र कुटूंबातील वडिलार्जीत मिळकतीचे वाटप मागणीकरिता प्रतिवादी क्रं. २ व १९ यांचेविरुध्द रे.मु.न. ३९१/२०१८ दाखल करुन सदर दाव्यामध्ये गट नंबर ६५७, ६४५, ६६१/१, ६५३ व ६५६ इत्यादी मिळकतीचे

वाटप करुन घेतले होते. त्याचा फे.नं. ६१७१ असा आहे. सदर दाव्याच्या हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीमधील त्यांना वाटून आलेल्या ३२ आर क्षेत्रापैकी प्रतिवादी क्रं. २ यांना ११ आर, प्रतिवादी क्रं. १८ यांना १०.५० आर व प्रतिवादी क्रं. १९ यांना १०.५० आर असे क्षेत्र वाटून मिळाले व तशी महसूल रेकॉर्ड सदरी नोंद देखील झाली. अशी सर्व परिस्थिती असताना वादी यांनी प्रस्तुतचा दावा सदरची मिळकत फुकटात मिळणेकरिता दाखल केल्याचे दिसते. वादी हा स्वच्छ हाताने मे. कोर्टात आलेला नाही. प्रथमदर्शनी केस न्यायाचा समतोल, प्रतिवादी यांच्यावतीने असून अर्ज नामंजूर करण्याची त्यांची विनंती आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखावरील कागदपत्रे पडताळुन पाहिले असता खालील मुद्दे माझ्या विचाराधिन उपस्थित झाले असुन त्यांची कारणमिमांसा त्यांच्या निष्कर्षा सहित या खाली दिलेली आहे.

| अ.न. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी यांनी सकृत दर्शनी केस शाबीत केली आहे काय ? | नकारार्थी |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय ? | नकारार्थी |
| ३ | तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय ? | नकारार्थी |
| ४ | अंतिम आदेश कोणता ? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ४ करीता

५. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकाशी संलग्न असल्यामुळे, कथनांची व्दिरुक्ती टाळण्यासाठी ते एकत्रित चर्चिले आहेत.

वादीतर्फे विव्दान विधीज्ञ श्री. कुलकर्णी यांनी असा युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी यांच्यात कृष्णा यांच्या हयातीत सन १९८० साली वाटप झाले होते. त्याप्रमाणे फे. नं. ८०२ देखील झाला आहे. त्यामुळे सदरचे वाटप कायदेशीर आहे. फे. न. २८७५ ने झालेले वाटप कायदेशीर नाही कारण पहिले वाटप झालेले आहे. तहसिलदार यांनी वाटप/एस.आर/४२८/२००१ मध्ये दिनांक २१/०१/२००२ रोजी दिलेला आदेश बेकायदेशीर आहे. एकदा वाटप झाले असेल तर पुन्हा वाटप करण्याची वादीला कोणतीही गरज नव्हती. फे. नं. २८७५ ने झालेल्या वाटपाप्रमाणे फळणीबारा झाल्याचा पुरावा नाही. जर फे. नं. २८७५ ने वाटप झाले तर रे.मु.न. २१९/२०१९ हा दावा का दाखल करण्यात आला. सन १९८० रोजी फे. नं. ८०२ ने झालेले वाटप प्रतिवादी यांना मान्य आहे. सदरचा फेरफार अव्हानीत केलेला नाही. सदर झालेले वाटप हे कृष्णाजीच्या हयातीतच झाले होते. त्यामुळे तेच वाटप योग्य व कायदेशीर आहे. दावा मिळकती या वडिलोपार्जीत मिळकत असल्याचे मान्य आहे. प्रतिवादी हे वादींच्या अपरोक्ष झालेल्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीमधील वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हिल्ला हरकत करु पहात आहेत व दावा

मिळकत विक्री करण्याची भाषा करित आहेत. त्यामुळे वादी यांना प्रसतुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणार अपरिमित असे नुकसान होणार आहे. प्रथमदर्शनी केस न्यायाचा समतोल वादीच्या वतीने आहे.सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती त्यांनी केली.

उलटपक्षी प्रतिवादीतर्फे विव्दान विधीज्ञ श्री गावडे यांनी असा युक्तीवाद केला की, फे. नं. ८०२ प्रमाणे संपूर्ण वडिलोपार्जीत मिळकतीचे वाटप झालेले नाही. उलटपक्षी फे. नं. २८७५ चे अवलोकन केले असता संपूर्ण वडिलोपार्जीत मिळकतीचे वाटप झाल्याचे दिसून येते. फे. नं. १७९८ चे अवलोकन केले असता कृष्णा मदने यांचा वारस फेरफार मध्ये अन्य मिळकतीचा उल्लेख असल्याचा दिसून येते. फे. नं. ८०२ ने वाटप झाले असेल तर वादी प्रतिवादी यांच्या आईचे व बहिणीचे नांव का नमूद नाही असाही युक्तीवाद त्यांच्यातर्फे करण्यात आला. त्यांनी नि. २७/७ कडे मा. तहसिलदार समोरील दाखल अर्जावरील क्रं. ४ च्या सहीकडे याकोर्टाचे लक्ष वेधून असा युक्तीवाद केला की, सदरचे सही वादी क्रं. १ यांची आहे. तसेच नि. २७/८ जबाबावर देखील वादी यांची सही असल्याचा त्यांचा युक्तीवाद आहे. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, गट नंबर ६४५  चे देखील फे. नं. २८७५ ने वाटप केलेले आहे. त्यांन पुढे असा युक्तीवाद वाद केला आहे की, ज्यावेळी वादी क्रं. १ व वादी क्रं. २ यांचे वाटप झाले त्यावेळी त्यांनी ७/१२ उतारे पाहिले नाहीत का ? फे. नं. ८०२ ने झालेल्या वाटपात

गट नंबर ४६१/१, ४६१/२ व ६४५, ६५७ या मिळकती समाविष्ट नाहीत. त्यांनी पुढे असादेखील युक्तीवाद केला आहे की, वादींच्या मुलाने दाखल केलेला रे.मु.नं. ३४/२००३ चे अवलोकन केले असता त्यांने त्या दाव्यामध्ये फे. नं. २८७५ ने झालेले वाटप मान्य केल्याचे दिसून येते. वादींना सन २००३ वेळी दाव्याविषयी माहिती असल्याचे दिसून येते. सन २००३ ला दाव्यात तडजोड होवून हुकूमनामा देखील झालेला आहे. वादी व प्रतिवादी यांच्या सर्वांची दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंदी देखील झालेल्या आहे. केवळ प्रतिवादींची मिळकत फुकटात गिळकृंत करण्याकरिता वादीने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समातोल प्रतिवादीच्यावतीने असून अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

**६.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली. येथे सर्वप्रथम प्रस्तुत प्रकरणांतील मान्य कथने नमूद करणे आवश्यक आहे. ते खालील प्रमाणे –

***अ.*** *दावा मिळकतीचे ७/१२ उता–यास वादी व प्रतिवादी यांचे नांव आहे.*

***ब.*** *फे. नं. ८०२ ने वादी व प्रतिवादी यांच्या नांवची नोंद आणेवारीने गट नंबर १६२ अ, ४८४, ६४५ व ६५३ या मिळकतींच्या रेकॉर्ड सदरी नोंद झाली.*

वर कथन केल्याप्रमाणे फे. नं. ८०२ ने केवळ गट नंबर १६२ अ, ४८४, ६४५ व ६५३ या मिळकतीस आणेवारीने वादी प्रतिवादी यांच्या नावाची नोंद झाल्याचे

दिसून येते. उलटपक्षी नि. २७/४ कडे दाखल असलेल्या फे. नं. १७९८ चे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी व प्रतिवादी यांचे मुळ पुरुष कृष्णा मदने हे १४/०७/१९९१ रोजी मयत झाले असून त्यांना वसंत, साहेबराव, लक्ष्मण व नारायण हे मुले तर लिलाबाई, छबुबाई व जनाबाई या मुली असल्याचे दिसून येते. तसेच सदर फेरफाराचे अवलोकन केले असता मयत कृष्णा मदने यांच्या नावे गट नंबर ४६१, ४६२, ४७१ व ४९२ या मिळकतीदेखील असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी फे. नं. ८०२ ने दावा मिळकतीचे वाटप झाल्याचे म्हणता येणार नाही. वादाकरिता जरी फे. नं. ८०२ ने दावा मिळकतीचे वाटप झाले असे गृहीत धरले तरी त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्या बहिणीचे नावे नोंद नाहीत. त्यामुळे सदरचा फेरफार हा वाटपाचा म्हणता येणार नाही. उलटपक्षी सदरचे फेरफाराचे अवलोकन केले असता केवळ आणेवारीने नावे दाखल झाल्याचे दिसून येते. त्यामुळे वादींने त्याअनुषंगाने केलेला युक्तीवाद येथे ग्राहय धरता येणार नाही.

७. फे. नं. २८७५ चे अवलोकन केले असता सदरचा फेरफार हा वाटपाचा असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. तसेच कृष्णाजीच्या वडिलोपार्जीत मिळकती म्हणजेच गट नंबर ४६१/१, ४६२/अ/१, ४७१, ६५७, ६५३ व ६४५ या सर्व मिळकतींचे वादी व प्रतिवादी यांचे नांवे वाटप झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच नि. २७/७ कडील दाखल असलेल्या मा. तहसिलदार सो यांचेसमोरील अर्जावर वादी क्रं. १ नारायण कृष्णा मदने यांची सही असल्याचे दिसून येते. तसेच नि. २७/८ कडील

जबाबावर देखील अ.क्रं. ३ वरील नारायण मदने म्हणजेच वादी यांची सही असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी नि. ३६/१ कडे रे.मु.न. ३४/२००३ च्या नि.१ ची छायांकित प्रत व सोबतच्या तडजोड पुरसिस व हुकूमनाम्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा वादीचा मुलगा दामोदर नारायण मदने यांनी अ.पा.क. सुमन नारायण मदने यांच्यामार्फत जाहिर ठराव, वाटप व निरंतर मनाईकरिता दाखल केल्याचे दिसून येते. सदर दाव्याचे अवलोकन केले असता परिच्छेद क्रं. २ मध्ये त्यांनी फे. नं. २८७५ ने वाटप झाल्याचे मान्य केल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रस्तुत दाव्यातील वादी क्रं. २ सुमन जी की वादी क्रं. १ यांची पत्नी आहे, त्यांना देखील फे. नं. २८७५ ने वाटप झाल्याचे मान्य असल्याचे दिसून येते. वादी यांचा त्यावर असा युकतीवाद आहे की, गट नंबर ६५३ सदर दाव्यात नमूद नाही व त्याविषयी प्रतिवादी यांनी देखील मागणी केलेली दिसून येत नाही. त्यामुळे सदर कागदपत्रे विचारात घेता येणार नाही. परंतु येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादी क्रं. २ यांनीच फे. नं. २८७५ ने झालेले वाटप रे.मु.न. ३४/२००३ या दाव्यात मान्य केलेले आहे. त्यामुळे पुन्हा वादींना सदर वाटप झाले नाही अथवा त्यांच्या अपरोक्ष झाले असे म्हणता येणार नाही. त्यास ***भारतीय पुरावा कायदा १८७२ चे कलम ११५ (Estoppel)*** ची बाधा येते. रे.मु.न. ३४/२००३ हा दावा वादींच्या मुलानेच अ.पा.क. सुमन मदने यांच्यामार्फत अन्य प्रतिवादी विरुध्द केला असल्यामुळे व त्यामध्ये फे.नं. २८७५ ने झालेले वाटप मान्य केले असल्यामुळे वादी. क्रं १ यांना त्याविषयी माहिती नव्हती असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादी स्वच्छ हाताने मे. कोर्टासमोर आले नसल्याचे दिसून येते.

वादी यांनी नि. ३४/१ कडे फे. नं. २८७५ विरुध्द मा. उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अपील /कावि/२७७/२०१९ ची छायांकित प्रत व विलंब माफीचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, मा. उपविभागीय अधिकारी यांच्यासमोरील प्रकरण संपुष्टात आलेले नाही. केवळ प्रकरण दाखल केले याचा अर्थ वादी स्वच्छ हाताने कोर्टात आला असे होत नाही. त्यामुळे सदर कागदपत्रांचा आधार वादींना तुर्तातुर्त ताकिद अर्जाच्या कामी घेता येणार नाही. वादी यांनी नि. ३४/२ कडे रे.मु.न. २१९/२०१९ या दाव्याची साक्षांकित प्रत दाखल केलेली आहे. वादी यांचा असा युक्तीवाद आहे की, जर फे.नं. २८७५ ने वाटप झाली असेल तर प्रतिवादी क्रं. २ चा मुलगा सुदाम यांने रे.मु.नं. २१९/२०१९ का दाखल केला. परंतु सदर दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दावा मिळकत म्हणून गट नंबर ३५३ हा नमूद आहे व त्यातील परिच्छेद क्रं. १ मध्ये सदर वादीने त्याचे नावे असलेले क्षेत्र १०.५० आर तसेच प्रतिवादी क्रं. ३ च्या नावे असलेले क्षेत्र १०.५० आर वगैरे उल्लेख करुन वाटप मागितलेले आहे. येथे पुन्हा फे.नं. २८७५ चे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर फेरफाराप्रमाणे साहेबराव कृष्णा मदने यांच्या नावे  दावा मिळकत गट नंबर ३५३ मधील क्षेत्र वाटपने दिली असल्याचे दिसून येते व तेच क्षेत्र रे.मुन. २१९/२०१९ मधील वादी म्हणजेच साहेबरावचा मुलगा सुदाम यांने वाटप करुन मागितलेले आहे. त्यामुळे वादी यांनी त्या अनुषंगाने केलेला युक्तीवाद येथे ग्राहय धरत येणार नाही.

८. नि. २७/११ कडे प्रतिवादी यांनी फे. न. २८९३ दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्रं. १ यांनी त्याच्यात व वादी क्रं. २ सुमन व मुलगा दामोदर यांच्यात ग.नं. ४६१/१, ४६२/२/अ/१, ४७१, ६५३, ४८४, ६४५ व ६५७ चे वाटप मा. तहसिलदार यांच्याकडे अर्ज देवून वाटप/एस.आर/७७/२००२ च्या आदेशाने केल्याचे दिसून येते. म्हणजेच प्रथमदर्शनी वाटप करताना वादी यांना सर्व मिळकतींच्या ७/१२ उता-यावरील नोंदी माहिती असल्याचे अनुमान निघते. तसेच फे. नं. २८९३ प्रमाणे झालेल्या वाटपाचे अवलोकन केले असता दावा मिळकत ग. नं. ६५३ चे एकूण ३२ आर क्षेत्र वादी क्रं. २ सुमनच्या नावे दिले असल्याचे दिसून येते. फे.नं. २८७५ ने झालेल्या वाटपात नारायण म्हणजे वादी यास ३२ आर क्षेत्र देण्यात आले होते. त्यामुळे तेवढेच क्षेत्र त्यांने फे. नं. २८९३ च्या वाटपाने वादी क्रं. २ ला दिले. जर दावा मिळकतीमधील संपूर्ण क्षेत्र वादी याच्याच मालकीचे होते तर त्याच्या घरगुती वाटपामध्ये केवळ ३२ आर क्षेत्राचा उल्लेख का केला याचा कोणताही खुलासा वादीतर्फे देण्यात आलेली नाही. प्रथमदर्शनी वादीला फे. नं. २८७५ ने झालेले वाटप माहित असल्याचे व मान्य असल्याचे दिसून येते व त्या प्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यास नोंदी झाल्याचे दिसून येते. एकीकडे वादी दाव्यात ग. नं. ६४५ ही मिळकत प्रतिवादी क्रं. १ व २ व प्रतिवादी क्रं. ३ चे वडिल वसंत यांना फे. नं. ८०२ ने मिळाली असे कथन करतो. तर फे. नं. २८९३ चे अवलोकन केले असता ग.नं. ६४५ ही मिळकत त्याच्या कौटूंबिक वाटपात घेतली

असल्याचे दिसून येते. म्हणजेच वादी यांना सर्व परिस्थितीची जाणीव असून सुध्दा ते स्वच्छ हाताने मे. कोर्टासमोर आले नसल्याचे दिसते. त्यामुळे वादीस पुन्हा दावा मिळकत त्याच्या एकटयाच्या मालकीची आहे असे म्हणता येणार नाही. वर नमूद सर्व कारणांवरुन असे दिसून येते की, वादी स्वच्छ हाताने मे. कोर्टासमोर आलेला नाही. त्यामुळे तुर्तातुर्त ताकिदीसारखी दाद मिळणेस वादी पात्र नाही.

प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या नि. २७ व नि. ४० कडील सन १९९८ ते २००८ पर्यतच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यास प्रतिवादी यांच्या नावची नोंद दिसून येते. त्यामुळे अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार असल्याचे दिसून येते. प्रथमदर्शनी केस न्यायाचा समतोल प्रतिवादी यांच्यावतीने आहे.

०९. येथे मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या ***Dalpat Kumar V/s Prahlad Singh (1992) 1 SCC 719*** या न्यायानिवाडयाचा आधार घेणे आवश्यक वाटते. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी असे अनुमान काढले आहे की, ***“ The first rule is that the applicant must make out a prima facie case in support of the right claimed by him. The Court must be satisfied that there is a bonafide dispute raised by the applicant, that there is a strong case for trial which needs investigation and a decision on merits, and on the facts before the Court there is probability of the applicant being entitled to the relief claimed by him.”***

मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या ***Martin Burne Ltd V/s R. N. Banerjee AIR 1958 SC 79*** या न्यायनिवाडयातील निष्कर्षाचे अवलोकन करणेदेखील आवश्यक आहे. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी असे अनुमान काढले आहे की, ***" A prima facie case does not mean a case proved to the hilt but a case which can be said to be established if the evidence which is lead in support of the same where believed. While determining whether prima facie case had been made out the relevant consideration is whether on the evidence led it was possible to arrive at the conclusion in question and not whether that was the only conclusion which could be arrived at on that evidence. It may be that the tribunal considering this question may itself have arrived at a different conclusion. It has only got to considered whether the view taken is a possible view on the evidence on record."***

प्रस्तुत प्रतिवादी देखील प्रथमदर्शनी केस शाबीत करत आहेत. त्यामुळे वर नमूद न्यायानिवाडयांमधील मा. सर्वोच्च न्यायालय यांचे निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीकरिता उपयुक्त आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल देखील प्रतिवादी यांच्यावतीने आहे. सबब मुद्दा क्रं. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी असुन मुद्दा क्रं. ४ करिता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

२. आजअखेर अस्तित्वात असणारा जैसे-थे चा आदेश रद्द करण्यात येतो.

दौंड | **(ए. ए. कळमकर)**
दिनांक – ३०.११.२०२१ | २रे सह दिवाणी न्यायालय
दौंड, जिल्हा पुणे

CERTIFIED

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | D. R. Kore, Stenographer Gr.III |
| Court Name | : | A. A.KALAMKAR |
| | : | 2nd Joint Civil Judge, Jr.Div. Daund. |
| Date of Judgment | : | 30.11.2021 |
| Judg. signed by P. O. | : | 30.11.2021 |
| Uploaded on | : | 30.11.2021 |